# विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय ( पुरवठा शाखा)

## जाहिर सुचना

विभागीय आयुक्त, कोकण विभाग, पुरवठा शाखा या कार्यालयास वाहनचालक संवर्गातील ०१ पद व शिपाई संवर्गातील ०२ पदे अशा एकुण ०३ पदाकरीता मनुष्यबळ पुरविण्याबाबत इच्छुक निविदाधारकांकडुन आदेश दिल्याच्या दिनांकापासून ११ महिन्याकरीता बाहययंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने वाहनचालक संवर्गातील ०१ पद व शिपाई संवर्गातील ०२ पदे अशा एकुण ०३ पदांची सेवा पुरविणा-या नोंदणीकृत संस्था/ बेरोजगार संस्थांकडुन मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याकरीता दरपत्रक मागविण्यात येत आहे. या बाबतची अधिक माहिती, अर्जाचा नमुना, निविदेच्या अटी व शर्ती व इतर तपशिलवार माहिती इत्यादी (www.http://divcomkonkan.gov.in) या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

तरी संबंधित ठेकदार/कंपनी/संस्था यांनी आपले दरपत्रक संकेत स्थळावरील अटी व शर्तीच्या अधीन राहून बिनचुक प्रपत्रात भरून बंद लिफाफ्यात दिनांक २५/०७/२०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यत उप आयुक्त, (पुरवठा शाखा), कोकण विभाग यांचे नावे विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, ४था मजला, इमारत कक्ष, रूम नं. ४०७,४०८ कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक २५ / ०७ /२०२५ पर्यत (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी ११.०० ते दुपारी .०० वाजेपर्यत स्विकारण्यात येतील व दिनांक २९/०७/२०२५ रोजी दुपारी २.३० वा. उप आयुक्त, (पुरवठा शाखा), कोकण विभाग यांचे दालनात उघडण्यात येईल.

**स्थळप्रतीवर मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग**
**यांची स्वाक्षरी असे**

उप आयुक्त,(पुरवठा) कोकण विभाग,
कोकण भवन

पुशा/कार्या-२अ/जाहिर सुचना/२०२५
दिनांक १५/०७/२०२५
(संपर्क क्र. ०२२-२७५७२३९९)

## परिशिष्ट-१

## निविदा प्रपत्र

दिनांक / /२०२५

प्रति,

मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग

कोकण भवन, नवी मुंबई- ४०० ६१४

विषय :- वाहनचालक व शिपाई पदांच्या सेवा बाहयस्त्रोताद्वारे उपलब्ध करुन घेणेबाबत...

महोदय,

आपले कार्यालयाकडील जाहिर सुचना क्रमांक पुशा/कार्या-२अ/जाहिर सुचना/२०२५, दिनांक / /२०२५ अन्वये आपले कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केलेल्या अर्जाचा नमुना, निविदेच्या अटी व शर्ती व इतर तपशिलवार माहिती इत्यादी नूसार मी वाहनचालक संवर्गातील ०१ पद व शिपाई संवर्गातील ०२ पदे अशी एकुण ०३ पदांची सेवा पुरविण्याबाबतचे दरपत्रक सोबत जोडले आहे.

१. कंपनी/ संस्थेचे नाव आणि पत्ता.

२. संपर्क क्रमांक कार्यालय:- (अ) दुरध्वनी :- (क) भ्रमणध्वनी:

(ब) फॅक्स : (ड) ई-मेल:

३. बँकेचे नाव व पूर्ण पत्ता:

अ. ब्रँच कोड :

ब. खाते प्रकार :

क.बँक खाते क्रमांक :

ड. MICR कोड :

ग. IFSC कोड :

४. संस्थेचे नोंदणी क्रमांक:

५. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम नोंदणी क्रमांक:

६. कर्मचारी राज्य विमा अधिनियम नोंदणी क्रमांक:

७. व्यवसाय कर अधिनियमांतर्गत नोंदणी क्रमांक:

८. वस्तू व सेवा कर अधिनियमांतर्गत नोंदणी क्रमांक:

९. आधारकार्ड क्रमांक :-

१०. संस्थेच्या पॅनकार्डची छायांकित प्रत :

११. कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेकडून जारी करण्यात आलेल्या किमान रु.२५,००,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस लक्ष) रकमेचे सॉल्व्हनसी/राष्ट्रीयकृत बँकेचे पत प्रमाणपत्र.

११. संस्थेच्या मागील तीन वित्तीय वर्षाची (सन २०२१-२२, सन २०२२-२३, सन २०२३-२४) सरासरी उलाढाल (Turn Over) रु. १.०० कोटीपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे निविदाकराने Chartered Accountant चे प्रमाणपत्र जोडावे.

१२. उच्च सुरक्षा क्षेत्रात (High Security Zone) एकल कार्यादेशात (Single Work Order) ५० पेक्षा अधिक मनुष्यबळ सेवा पुरविल्याबाबतचा कमीत कमी २ वर्षाचा अनुभव. (आदेशाची प्रत/प्रमाणपत्राची प्रत जोडावी.)

१३. मागील तीन वर्षाच्या सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ या कालावधीत सेवा पुरविलेल्या आस्थापनांचे/कार्यालयांचे नाव व पत्ते (मनुष्यबळ पुरवठा केलेल्या शासकिय /निम शासकिय संख्येसह)

१४. संस्थेच्या प्रतिनिधीचे नाव, पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक:

१५. कंत्राटी कामगार अधिनियमाच्या अंतर्गत कंत्राटी कामगारांच्या कामासाठी कामगार आयुक्तांकडील परवान्याची प्रत.

१६. आस्थापना व दुकाने अधिनियमानुसार (Shop & Establishment Act), मुंबई/मुंबई उपनगर/नवी मुंबई/ठाणे मनपा यांचे नोंदणी प्रमाणपत्र, (गुमास्ता लायसन्स)

१७. ISO.१०६६७-२:२०२० प्रमाणपत्राची प्रत.

१८. कोणत्याही शासकीय/निमशासकीय/सहकारी संस्थेने निविदाकार संस्थेस काळया यादीत टाकले नसल्याचे/बंदी घातले नसल्याचे कोणताही खटला दाखल केलेला नसल्याचे रु.१००/- चे बाँड पेपरवर स्वप्रमाणित करणे आवश्यक आहे.

१९. किमान वेतन अधिनियमातंर्गत वेतन व इतर अनुज्ञेय भत्ते कर्मचा-यांना अदा करण्यात येईल याबाबत रुपये १००/- च्या बाँड पेपरवर स्वप्रमाणित करणे आवश्यक आहे.

---

टीप: - **निविदाकार सर्व आवश्यक माहिती मूळ निविदा फॉर्ममध्ये सादर करतील आणि पुराव्याच्या समर्थनार्थ आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडतील.**

निविदेतील सर्व पृष्ठे अनुक्रमित असावी आणि त्यावरील सर्व पृष्ठावर अधिकृत स्वाक्षरीकाराने स्पष्ट स्वाक्षरी केलेले आणि मुद्रांकित केले पाहिजे.

मी /आम्ही निविदा दस्तऐवजांचे सर्व नियम आणि अटी वाचल्या आहेत आणि मी/आम्ही त्यांचे पालन करण्यास बांधील आहे/आहोत.

**स्वाक्षरीकर्त्याचे नाव व तपशिल:** **स्वाक्षरी (अधिकृत)**

## सर्वसाधारण सूचना :-

१.१ मनुष्यबळ पुरविणा-या नोंदणीकृत संस्थांची कार्यालये मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे महानगरपालिका किंवा नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत असेल, अशा संस्थांनी निविदा सादर करावी. त्यासाठी निविदाकारांनी वरील ठिकाणी कार्यालय असल्याबाबत गुमास्ता लायसन्स (Shop & Establishment License) तसेच सदर जागा भाडयाची असल्यास स्टॅम्पडयुटी भरुन नोंदणी केलेला भाडेकरार सादर करावा.

१.२ निविदाकाराने तांत्रिक व वाणिज्यिक निविदांमधील सर्व माहिती भरणे आवश्यक आहे अन्यथा संबंधित निविदाकाराची निविदा रद्द करण्यात येईल.

१.३ निविदेसोबत कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. Technical Bid उघडताना जोडलेली कागदपत्रे आवश्यकतेनुसार तपासणीसाठी या कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

१.४ निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसापासून १२० दिवस वैध राहील.

१.५ निविदाकाराने निविदा सादर करण्यापुर्वी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्रमांक भांखस २०२१/प्र.क्र.८/उद्योग-४, दिनांक ०७/०५/२०२१ चे अवलोकन करावे. तसेच उद्योग, ऊर्जा कामगार विभागाचे परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र. १३/कामगार-८, दिनांक २२/०२/२०१९ चे शासन परिपत्रक यामधील कर्मचाऱ्यांना देय असलेले भत्ते व इतर सवलती यांचे अवलोकन करुन ई-निविदा सादर करावी.

१.६ केंद्र शासनाच्या दि.०६/०१/२०२३ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनाद्वारे विहीत केलेले ३.८५% ते ७% या मर्यादेत सेवाशुल्क लागू राहील.

२ बयाणा रक्कम :-

२.६ निविदा स्पर्धेत भाग घेणा-या निविदाकाराने रु. २०००/- इतकी ना परतावा निविदा शुल्क (Tender Fee) डिमांड ड्राफ्टव्दारे भरणे आवश्यक आहे. आणि रु. १००००/- (अक्षरी रक्कम रुपये दहा हजार मात्र) इतकी बयाणा रक्कम निविदा मंजूर झाल्यानंतर डिमांड ड्राफ्टव्दारे भरणे आवश्यक आहे.

२.७ बयाणा रक्कम भरण्यापासून विहीत निकषानुसार सुट असल्यास त्याबाबतचे नजीकच्या काळातील सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र स्पष्ट सही शिक्क्यांसह संबंधित निविदाकाराने निविदेसोबत कॉपी सादर करणे आवश्यक राहील.

२.८ निविदा स्विकारल्यानंतर किंवा वैधता कालावधी समाप्तीनंतर यापैकी जे आधी घडेल ते, त्यानुसार अयशस्वी निविदाकारांची बयाणा रक्कम परत केली जाईल. यशस्वी निविदाकाराच्या बाबतीत काम देण्यापुर्वी देय असणारी सुरक्षा ठेव रक्कम भरल्यानंतर बयाणा रक्कम परत दिली जाईल. यशस्वी निविदाकाराने निर्धारीत कालावधीत सुरक्षा ठेवीची रक्कम भरली नाही किंवा कराराचा भंग केल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२.९ बयाणा रक्कमेवर कोणतेही व्याज देय असणार नाही.

**३ सुरक्षा ठेव :-**

३.६ यशस्वी निविदाकर्ता, निविदा स्विकारल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत, अधिकृत राष्ट्रीय बँकेकडील सोबत जोडलेल्या परिशिष्ट -३ नुसार बँक गॅरंटीच्या स्वरुपात एकूण ०३ कर्मचारीप्रमाणे एकूण २ वर्षाच्या कालावधीकरीता होणा-या मानधनाच्या एकूण निविदेच्या मुल्याच्या (एकूण रकमेच्या ) ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत ठेव म्हणून या विभागाकडे जमा करेल आणि निविदाकर्ता करार दस्तऐवज पूर्ण करण्यास अयशस्वी ठरल्यास त्याची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

**३.२** या कराराच्या किंवा अन्य कराराच्या अटीनुसार कंत्राटदाराकडून देय असलेली सर्व नुकसान भरपाई किंवा इतर रकमा या सुरक्षा ठेवीमधून वजा केल्या जातील.

**३.३** सुरक्षा ठेवीवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

**३.६** करार संपल्यानंतर ९० दिवसांच्या मुदतीत सुरक्षा ठेव परत दिली जाईल.

३. निविदा दोन लिफाफे प्रणालीनुसार स्विकारली जाईल:-

४.अ) लिफाफा क्र.१:- तांत्रिक निविदा लिफाफ्यात खालील कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती जोडाव्यात.

| | |
|---|---|
| १) | निविदा प्रपत्र ( परिशिष्ट-१) |
| २) | निविदा प्रपत्र फी डिमांड ड्राफ्टव्दारे जमा करण्यात यावी |
| ३) | संस्थेची मागील तीन वित्तीय वर्षाची (सन २०२१-२२, सन २०२२-२३, सन २०२३-२४) सरासरी उलाढाल (**Turn over**) रु. १.०० कोटीपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. निविदाकाराने **Chartered Accountant** चे प्रमाणपत्र जोडावे. |
| ४) | उच्च सुरक्षा क्षेत्रात (**High Security Zone**) एकल कार्यादेशात (**single work order**) ५० पेक्षा अधिक मनुष्यबळ सेवा पुरविल्याबाबतचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव. (प्रमाणपत्र जोडावे) |
| ५) | वस्तु व सेवा कर अधिनियमांतर्गत नोंदणी प्रमाणपत्र जोडावे |
| ६) | व्यवसाय कर अधिनियमांतर्गत नोंदणी प्रमाणपत्र जोडावे |
| ७) | कर्मचारी भविष्य निधी अधिनियम आणि कर्मचारी राज्य विमा अधिनियमांतर्गत नोंदणी प्रमाणपत्र जोडावे |
| ८) | कंत्राटी कामगार अधिनियमाच्या अंतर्गत कंत्राटी कामगारांच्या कामासाठी कामगार आयुक्तांकडील परवान्याची प्रत जोडावी |
| ९) | संस्थेच्या पॅनकार्डची छायांकित प्रत जोडावी |
| १०) | आस्थापना व दुकाने अधिनियमानुसार (Shop & Establishment Act), मुंबई/मुंबई उपनगर/नवी मुंबई/ठाणे मनपा यांचे नोंदणी प्रमाणपत्र (गुमास्ता लायसन्स) जोडावे |
| ११) | कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेकडून जारी करण्यात आलेल्या किमान रु.२५,००,०००/- रक्कमेचे सॉल्व्हनसी/राष्ट्रीयकृत बँकेचे पत प्रमाणपत्र जोडावे |
| १२) | **ISO. १०६६७-२:२०२०** प्रमाणपत्राची प्रत जोडावी |
| १३) | कोणत्याही शासकीय/निमशासकीय/सहकारी संस्थेने निविदाकार संस्थेस काळया यादीत टाकले नसल्याचे/बंदी घातले नसल्याचे कोणताही खटला दाखल केलेला नसल्याचे रु.१००/- चे बाँड पेपरवर स्वप्रमाणित करणे आवश्यक आहे. |
| १४) | किमान वेतन अधिनियमातंर्गत वेतन व इतर अनज्ञेय भत्ते कर्मचा-यांना अदा करण्यात येईल याबाबत रुपये १००/- च्या बाँड पेपरवर स्वप्रमाणित करणे आवश्यक आहे. |

सर्व निविदा दस्तऐवज वरील अनुक्रमांमध्ये निर्देशांक पृष्ठ आणि पृष्ठ क्रमांकांसह सादर कराव्यात.

**४-अ १)** ४-अ मधील विविध दस्तऐवजाची निविदाकार पुर्तता करीत नसल्यास, तांत्रिक समिती नोंद घेईल आणि त्या निविदाकर्त्याचा लिफाफा क्र. २ पुढील कार्यवाहीसाठी विचारात घेण्यात येणार नाही. निविदा तपासणीनंतर पात्र असल्याचे आढळून आलेल्या निविदाकारांचा वाणिज्यक निविदा लिफाफा उघडण्यात येईल.

**४-अ २)** निविदा उघडण्यात येतील व त्या उघडल्यानंतर त्यांची छाननी करुन पात्र व अपात्र उमेदवार ठरविण्यात येतील. अपात्र उमेदवारांच्या निविदा नाकारण्यात येतील व त्यांची बयाणा रक्कम परत करण्यात येईल.

**४-अ ३)** काही अपरिहार्य कारणांमुळे निविदा प्रक्रियेतील वेळापत्रकात बदल होऊ शकतो. त्याबाबतच्या सूचना कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रदर्शित करण्यात येतील.

४.ब) **लिफाफा क्र. २: - व्यावसायिक निविदा लिफाफ्यात खालील दस्तऐवज असेल.**

४-ब १) व्यावसायिक निविदा, परिशिष्ट २ मध्ये दिलेल्या नमुन्यानुसार असावा.

**४-ब २)** किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार व उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या शासन अधिसूचना असाधारण क्रमांक ११८ क्रमांक किवेअ ०४२४/प्र.क्र. ५५/कामगार-७, दिनांक १२.०८.२०२४ च्या निर्णयानुसार व शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१३/ कामगार-८, दिनांक २२.०२.२०१९ यामधील अनुज्ञेय असलेले विशेष भत्ता, इतर भत्ते व महागाई भत्यांत होणारी संभाव्य वाढ विचारात घेऊन वाणिज्यक निविदा सर्व करांसह भरण्यात यावी. निविदा मिळविण्यासाठी किमान वेतनापेक्षा कमी दराची निविदा भरल्याचे आढळून आल्यास सदरची वाणिज्यक निविदा निम्नतम दराची असेल तरी ती अवैध ठरवून रद्द करण्यात येईल.

**४-क ३)** निविदेत नमूद केलेले दर हे करारनामा केल्यानंतर २ वर्षाच्या निविदा कालावधीत कायम राहतील व कोणत्याही परिस्थितीत दरामध्ये वाढ होणार नाही.

५. <u>निविदा खालील कारणास्तव नाकारण्यात येतील: -</u>

**५.१** निविदाकारांनी निविदा सादर करण्याबाबत निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन केले नाही.

**५.२** निविदाकारांनी निविदा किंवा निविदा प्रक्रियेत कोणत्याही कामाचे किंवा परवानगी दिलेल्या वेळेत किंवा अन्य कोणतीही परिस्थितीत बदल करण्याचे प्रस्तावित केले असेल.

**५.३** निविदाकारांनी दस्तऐवजाच्या कोणत्याही पृष्ठावर कोणतीही सुधारणा, वाढ व फेरबदल केले असेल.

**५.४** निविदा नमुन्यामधील कोणतीही पृष्ठे काढून टाकली असतील किंवा बदल केले असेल.

**५.५** निविदाकारांनी सर्व दुरुस्त्या आणि जोडण्या किंवा पेस्ट केलेल्या स्लिप्सवर सही केलेली नाही आणि संस्था किंवा कंपनीच्या बाबतीत प्रत्येक भागीदाराने त्यावर सही केली नाही.

**५.६** निविदाकाराने कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) कायदा १९७० आणि महाराष्ट्र कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) नियम १९७० च्या खाली आवश्यक असणारी सहाय्यक कामगार आयुक्त यांच्याकडे नोंदणी असल्याची मूळ परवान्याची प्रत किंवा प्रमाणित प्रत सादर केलेली नाही.

**५.७** निविदाकारांनी मागणीनुसार मूळ कागदपत्रे तपासणीसाठी सादर न केल्यास अथवा अपूर्ण सादर केल्याचे आढळल्यास किंवा अपलोड केलेल्या प्रती व मूळ प्रती यामध्ये फरक आढळल्यास सदर निविदा, निविदा प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

**५.८** निविदाकाराने व्यावसायिक निविदेमधील दर अंक व अक्षरामध्ये सादर केलेले नाही.

**६. सुरक्षा ठेव (अनामत रक्कम) खालील प्रकरणी जप्त केली जाईल: -**

**६.१** कार्यादेश दिलेला निविदाकार स्विकृत निविदा कालावधीत कोणत्याही कारणाने सेवा पुरविण्यास असमर्थ ठरल्यास.

**६.२** स्विकृत निविदाकाराने निविदा कालावधीत उपलब्ध करुन दिलेल्या कर्मचा-यांची वेतन व भत्ते इत्यादी ची देणी थकित असल्यास.

**६.३** स्विकृत निविदाकराने देय असलेले सर्व प्रकारचे कर/वजावटी पूर्णत: संबंधित प्राधिकरणाकडे भरणा केला नसल्यास.

**६.४** निविदेतील अटी व शर्तींचा भंग केल्यास.

**७. अस्विकृती**

**७.१** निविदा दस्तऐवज हस्तांतरणीय नाहीत. निविदा स्वीकृत होण्यासाठी निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापासून १२० दिवसाच्या कालावधीसाठी ग्राह्य धरली जाईल.

**७.२** सुरक्षा ठेव रक्कम (अनामत रक्कम) जमा केल्यानंतर, उप आयुक्त (पुरवठा) कोंकण विभाग, कोंकण भवन आणि यशस्वी निविदाकार यांचेसोबत करारपत्र करण्यात येईल. सदर करार करण्यासाठीचा मुद्रांक आणि त्यावरील सर्व प्रकारचा कायदेशीर खर्च यशस्वी निविदाकाराने करावा लागेल.

**७.३** या निविदा सूचनेमध्ये समाविष्ट नसलेल्या किंवा कराराच्या सर्वसामान्य अटी किंवा विनिर्देश इत्यादी बाबतीत, महाराष्ट्र राज्यामध्ये प्रचलित असलेल्या अटी सामान्यतः लागू असतील.

**७.४** वाणिज्यिक निविदा (Commercial Bid) सर्व प्रस्तावित करासह आणि सर्व अनुषंगिक शुल्कासह मनुष्यबळाच्या एका महिन्याच्या पगाराएवढा सादर करावा

**७.५** एखाद्या संस्थेव्दारे सादर करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत, अशा संस्थेच्या वतीने निविदा सादर करणाऱ्या व्यक्तीचे नाव देणे आवश्यक असून ती व्यक्ती करारनामा करण्यास अधिकृत असावी आणि त्याने संस्थेच्या वतीने निविदा सादर करण्यासाठी त्यासंबंधीचे मूळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

**७.६** उप आयुक्त (पुरवठा) कोंकण विभाग, कोंकण भवन यांच्या अंतिम अधिकारानुसार सर्वात कमी दराची किंवा कोणत्याही विशिष्ट निविदा स्विकारण्यास किंवा कोणत्याही किंवा सर्व निविदा नाकारल्याबद्दल कोणतेही कारण देणार नाही.

**७.७** निविदा सादर करण्याच्या अंतिम मुदतीपुर्वी निविदा दस्तऐवजामध्ये फेरबदल किंवा सुधारणा करण्याबाबतचे हक्क राखून ठेवण्यात आले आहेत. त्याबाबत शुध्दीपत्रकाव्दारे कळविण्यात येईल.

**७.८** यशस्वी निविदाधारकांना मनुष्यबळाच्या पुरवठ्यासाठी असणा-या सर्व प्रचलित कायद्यांचे पालन करावे लागेल.

**७.९** स्विकृत निविदा कालावधी विभागातील नियमित पदे भरण्यापर्यंत किंवा २ वर्ष यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीसाठी वैध असेल.

## ८. कायद्याचे नियमन व विवादाचा निपटारा:-

**८.१.** कार्यादेश व करारासंबंधीत उद्भवलेल्या कोणत्याही वादग्रस्त मतभेदाचे उप आयुक्त (पुरवठा) कोंकण विभाग, कोंकण भवन आणि संस्थेचे प्रतिनिधी थेट चर्चा करुन सौदार्हपूर्ण वातावरणात निराकरण करण्याचा प्रयत्न करतील.

**८.२** सदर कराराच्या अनुषंगाने कोणताही विवाद उद्भवल्यास याबाबतची संपुर्ण कार्यवाही मा. मुंबई न्यायालयांच्या अधिकारक्षेत्रात होईल.

## ९. दिवाळखोरी आणि कर्तव्यात कसुरीसाठी दरकरार समाप्ती.

९.१ दिवाळखोरीसाठी समाप्ती: -

स्विकृत निविदाकार संस्था दिवाळखोर आढळल्यास, अशा संस्थेस उप आयुक्त (पुरवठा) कोंकण विभाग, कोंकण भवन हे १ महिन्याची नोटीस देऊन कोणतीही नुकसान भरपाई न देता कार्यादेश/करार संपुष्टात आणेल.

९.२ खालीलप्रमाणे सेवा करार संपुष्टात आणण्यात येईल: -

अ) शासनाने कार्यादेशाव्दारे दिलेल्या कालावधीत किंवा वाढीव कालावधीत स्विकृत निविदाकर संस्था सेवा देण्यास अयशस्वी ठरल्यास.

ब) स्विकृत निविदाकार संस्था कार्यादेश व करारांतर्गत दिलेल्या अटी व शर्तीनुसार कोणत्याही जबाबदा-या पार पाडण्यात अयशस्वी ठरल्यास.

## १०. अस्विकृती

**१०.१** विभागीय आयुक्त कार्यालय, पुरवठा शाखा, कोंकण विभाग, कोंकण भवन येथील अधिकारी/ कर्मचा-यांचे नातेसंबंधातील जवळच्या नातेवाईकांना या निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही. या प्रयोजनासाठी जवळच्या नातेवाईकांची व्याख्या अशी करण्यात आली आहे -

(अ) हिंदू अविभक्त कुटुंबाचे सदस्य.

(ब) त्यांचे पती किंवा पत्नी

(क) वडील, आई, मुलगा, सून, मुलगी, जावई, भाऊ, बहिण यांच्याप्रमाणे संबंधित असलेले.

**१०.२** ज्या कंत्राटदार/संस्थेचे यापूर्वी शासकीय/निमशासकीय/सहकारी संस्था यांना मनुष्यबळ सेवा पुरविण्यासाठी निवड केली होती व अशा कंत्राटदार/संस्थेविरोधात कोणतीही तक्रार संबंधित कार्यालयास प्राप्त झाली होती व त्या तक्रारीत तथ्य असेल वा त्या तक्रारीचे रितसर निवारण झालेले

नसेल, अशा कंत्राटदाराला/संस्थेला या निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही. तसेच अशा कंत्राटदाराची अन्य संस्था असल्यास त्या संस्थेला किंवा त्या कंत्राटदाराच्या जवळच्या नातेवाईकाची वा भागीदाराची अन्य संस्था असेल तर अशा संस्थेला किंवा कंत्राटदार जर अन्य संस्थेत भागीदार असेल तर अशा संस्थेला निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही.

**११. अतिरिक्त अटी व शर्ती**

११.१ उप आयुक्त (पुरवठा) कोंकण विभाग, कोंकण भवन विभागास आवश्यक असलेल्या एकूण ०३ कर्मचा-यांची सेवा पुरवठादाराने/कंत्राटदाराने उपलब्ध करुन दिलेल्या कर्मचा-यांची सेवा हया कंत्राटी तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपाची असून कोणत्याही उमेदवारास भविष्यात या पदावर कोणताही अधिकार प्राप्त होणार नाही.

११.२ कंत्राटी तत्त्वावर नियुक्त केलेल्या कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

११.३ उमेदवार भारतीय नागरीक असावा. तसेच किमान दहावी (एस.एस.सी.) उत्तीर्ण असावा. त्यास मराठी लिहिता/वाचता/बोलता येणे आवश्यक राहील. तसेच हिंदी/इंग्रजीचे किमान ज्ञान असावे.

११.४ उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे व कमाल ४३ वर्षे इतके असावे.

११.५ संस्थेतर्फे पुरविण्यात येणारा उमेदवार गुन्हेगारी पार्श्वभूमीचा किंवा अपप्रवृत्तीचा नसावा. याबाबतचे स्वयंघोषणापत्र उमेदवार तसेच संबंधित संस्थेने दाखल करणे आवश्यक राहील.

११.६ उमेदवाराची वैयक्तिक माहिती आवश्यक त्या सांक्षाकित कागदपत्रांसह शासनाच्या मागणीनुसार पुरविण्यात यावी. (शैक्षणिक अर्हता, आधार कार्ड, पॅन कार्ड, कायम व सध्याचा पत्ता, नमुना स्वाक्षरी व पासपोर्ट साईज फोटोग्राफ)

११.७ सेवा पुरवठाराने प्रत्येक उमेदवाराचे चारित्र्य प्रमाणपत्र (Character certificate) संबंधित पोलिस ठाण्यांकडून उपलब्ध करुन द्यावे.

११.८ कार्यालयीन कामाकाजाची वेळ सकाळी ९.३० ते सांयकाळी ६.३० अशी राहील. यासाठी संबंधित उमेदवाराने त्याची कार्यालयात येण्याची व कार्यालय सोडण्याची वेळ याबाबत उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या (प्रशासन-४) या कार्यासनात ठेवण्यात येणा-या हजेरीपटावर नोंद करणे आवश्यक आहे.

११.९ शिपाई कर्मचा-याने कार्यालयीन वेळेत पुरुष कर्मचा-याने पांढ-या रंगाचा गणवेश (शर्ट-पँट) व महिला कर्मचा-यांने निळया रंगाची साडी किंवा ड्रेस गणवेश परीधान करावा. तसेच कार्यालयात शिस्तीचे अनुपालन करावे.

११.१० कार्यालयीन वेळे व्यतिरिक्त आवश्यकता असेल त्यानुसार कर्मचा-यास उशिरा थांबून काम करावे लागेल. कार्यालयीन वेळे व्यतिरिक्त केलेल्या कामाचा कोणत्याही प्रकारचा मोबदला दिला जाणार नाही.

११.११ शासकीय नियमानुसार सुट्टया अनुज्ञेय असतील. आवश्यकता असल्यास सुट्टीच्या दिवशीही कर्मचा-यास कामावर यावे लागेल. तसेच यासाठी कोणताही अतिरिक्त मोबदला दिला जाणार नाही.

११.१२ सेवा पुरवठादार/कंत्राटदाराने उपलब्ध करुन दिलेला एखादा उमेदवार एका आठवडयापेक्षा जास्त कालावधीसाठी गैरहजर राहणार असेल, तर त्याच्या जागी दुसरा उमेदवार उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसे न झाल्यास त्या उमेदवाराचे गैरहजर दिवसाचे/दिवसांचे वेतन अधिक (+) प्रतिदिन रुपये ५००/- दंड अशी रक्कम कपात करुन उर्वरित मासिक मोबदला सेवा पुरवठादारास दिला जाईल.

११.१३ कर्मचारी कामावर असताना नशापान/धुम्रपान व तंबाखुजन्य पदार्थाचे सेवन करु नये.

११.१४ कंत्राटदाराने उपलब्ध करुन दिलेल्या उमेदवारास दुर्देवाने गंभीर स्वरुपाची इजा झाल्यास वैद्यकीय खर्चाचे अथवा नुकसान भरपाईचे कोणतेही दायित्व शासनाकडे राहणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी सेवा पुरवठादार/कंत्राटदाराची राहील.

**११.१५** सेवा पुरवठादाराने/कंत्राटदाराने शासनाने निर्धारित केलेल्या किमान वेतन दराने वेतन व वेळोवेळी लागू असलेले अनुज्ञेय भत्ते कर्मचा-यास अदा करणे बंधनकारक आहे. तसेच कर्मचाऱ्यांना देय असलेले कायदेशिर दायित्व उदा. ई.पी.एफ., इ.एस.आय.सी., कामगार वेल्फेअर फंड, बोनस, अन्य भत्ते इत्यादी बाबी कर्मचा-यांच्या वेतनातून कपात करुन संबंधित प्राधिकरणांकडे जमा करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. याबाबत शासनाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. त्या कपातीसंदर्भात कागदपत्रे मागणीनुसार उपलब्ध करुन द्यावी लागतील.

**११.१६** शासनाने निविदा स्विकृत केलेल्या निविदाधारकांस निविदेतील मनुष्यबळाची मागणी विभागाच्या गरजेनुसार व निकडीनुसार पुरवठा करणे बंधनकारक राहील. पुरवठा केलेले मनुष्यबळ योग्य दर्जाचे नसल्याचे विभागाच्या निदर्शनास आल्यास, सदर दरकरार कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येईल.

**११.१७** निविदेतील दर हे निविदा स्विकृतीनंतर दोन वर्षासाठी अस्तित्वात राहतील. सदर दर दोन वर्षे किंवा पुढील दर करार होईपर्यंत कायम राहतील. सदर करार केव्हाही संपुष्टात आणण्याचे अथवा त्यास मुदतवाढ देण्याचे अधिकार शासनास राहतील.

**११.१८** सेवा पुरवठादार/कंत्राटदार यांनी पुरविलेले कर्मचारी हे विभागाच्या सक्षम अधिका-यांच्या नियंत्रणाखालील काम करतील.

**११.१९** पुरविण्यात येणारे मनुष्यबळ/शिपाई यांना दरमहा १० तारखेच्या आत वेतन व वेतनचिठ्ठी देण्याची जबादारी सेवा पुरवठादार/कंत्राटदाराची राहील.

**११.२०** एखादा कर्मचारी काम सोडून गेल्यास त्याऐवजी दुसरा प्रशिक्षित कर्मचारी त्वरीत उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संस्थेची राहील. सेवा पुरवठादार/कंत्राटदाराने पुरविलेल्या कर्मचा-यांचे काम समाधानकारक न आढळल्यास त्याच्या जागी संस्थेने दुसरा कर्मचारी तात्काळ उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

**११.२१** सेवा पुरवठादार/कंत्राटदार यांनी या विभागात काम करण्यासाठी उपलब्ध करुन दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर राहणार नाही. त्याअनुषंगाने सदर कर्मचारी नियमित कर्मचा-याप्रमाणे वेतन, भत्ते व अन्य सुविधांची मागणी करु शकणार नाहीत. तसेच दरकरार कालावधीत किंवा कालावधी संपल्यावर शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत दावा करु शकणार नाहीत.

**११.२२** दरकरारात ठरल्यानुसार खरेदीदार दरकरार कालावधी सेवापुरवठादारास /कंत्राटदारास मोबदला/ मानधन अदा करील. त्यापेक्षा कोणतीही अधिकची रक्कम अदा करणार नाही.

**११.२३** देयक अदा करण्यासाठीच्या पृष्टर्थ त्या त्या महिन्याचे देयक दर महिन्याच्या ५ तारखेपूर्वी सेवा पुरवठादाराने विभागास सादर करावे, जेणेकरुन लवकरात लवकर देयक अदा करणे शक्य होईल.

**११.२४** नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना कामाचे वेतन व त्यानुषंगिक सर्व भत्ते रोख स्वरुपात अदा न करात NEFT/RTGS या बँक हस्तांतरणाद्वारे संबंधित कंत्राटी कामगाराच्या वैयक्तिक बँक खात्यात दरमहा १० तारखेपूर्वी जमा करणे सेवापुरवठादार/ कंत्राटदारास बंधनकारक राहील.

**११.२५** सेवापुरवठादार/कंत्राटदार यांचेशी केलेल्या दरकरारानंतर भारतीय कायदयांमध्ये झालेल्या बदलांनुसार विविध कर व शुल्क यांच्या दरात बदल झाल्यास त्यानुसार सेवापुरवठादार/कंत्ररटदार सुधारीत दरानुसार कर/शुल्काचा भरणा योग्य त्या प्राधिकरणाकडे करेल. तथापि दरकराराव्यतिरिक्त कोणतीही अतिरिक्त सेवा पुरवठादारास रक्कम देण्यात येणार नाही.

**११.२६** कामगारविषयक सर्व कायद्यांचे पालन करण्याची जबाबदारी संस्थेची राहील. तसेच वैद्यकीय भत्ता व इतर आवश्यक सेवा भत्ते पुरविण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

**११.२७** मनुष्यबळ पुरवठा कंत्राटाच्या अनुषंगाने कोणत्याही वैधानिक बाबींची समस्या उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील व याबबतीत खरेदीदाराचे नाव पक्षकार म्हणून गोवले गेल्यास त्याची सर्व जबाबदारी संस्थेची राहील.

११.२८ संस्थेस खालील कागदपत्रे मागणीनुसार करारापूर्वी किंवा कराराच्या दिनांकास सादर करील.

अ) कर्मचा-यांची यादी

ब) कर्मचा-यांचा सविस्तर तपशील

क) शैक्षणिक पात्रता व वयासंबंधी साक्षांकित दस्तोवज

**११.२९** या कराराशी जोडलेले किंवा उद्भवलेले कोणतेही विवाद किंवा फरक असल्यास, उप आयुक्त (पुरवठा) कोंकण विभाग, कोंकण भवन यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

**११.३०** करारावर स्वाक्षरी केल्यानंतर, पुरवठादार संस्था विभागाच्या आवश्यकतेनुसार मनुष्यबळाचा पुरवठा करील. प्रत्येक महिन्याला विभागास त्यांची सेवा प्रदान केल्यावर, पुरवठादार संस्थेस त्यांची देयके ई-पेमेंटद्वारे अदा करील.

**मी/आम्ही वरील निविदा सूचनेमधील सर्व कलमे काळजीपूर्वक वाचले असून, मी/आम्ही सदर निविदा सूचनेतील सर्व अटींशी सहमत आहे/आहोत.**

**स्वाक्षरीकर्त्याचे नाव व तपशिल:**

**स्वाक्षरी (अधिकृत)**